**शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे**

विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

**मंगल कार्यालय**

लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
**सौभाग्य मंगल कार्यालय**
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २२१ वा | बुधवार, दि. ०९ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# 'भाव बढेंगे तो ही हम बचेंगे'

## गॅस दरवाढीवर शरद पवार गटाचा सणसणीत टोला

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** गॅस दरवाढीनंतर देशभरात नाराजी पसरलेली असतानाच आता विरोधकांनी सुद्ध मोदी सरकारविरोधात मोर्चा उघडला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटाने जनतेसाठी मोदी सरकारकडून एक खुलं पत्र लिहिलं आहे.

या पत्रात मोदी सरकारच्या धोरणावर तिरकस टीका करण्यात आली. मोदी सरकारच्या धोरणाचा समाचार घेतानाच जनतेला आता ही दरवाढ सहन करण्याशिवाय पर्याय नसल्याचे स्पष्ट केले आहे.

**काय आहे या खुल्या पत्रात**

शरद पवार गटाने त्यांच्या अधिकृत एक्स हँडलवर हे पत्र शेअर केले आहे. गॅस दरवाढीवर मोदी सरकारचं खुलं पत्र, असं या पत्राचं शीर्षक आहे. या पत्रातील मजकूरानुसार, ' प्रिय देशवासीयांनो, तुमच्या आशीवार्दाने आम्ही पुन्हा एकदा सत्तेची ऊब अनुभवत आहोत. पण आम्ही सत्ताधीश होण्यासाठी केलेल्या करामतीची किंमत चुकवण्याची वेळ आता आली आहे. म्हणूनच आम्ही पुन्हा घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ५० रुपयांची सौम्य दरवाढ करतोय. तर आता तुम्हाला महागईची धग




सहन करावी लागेल. तर कृपया निमूटपणे सहन करा. वाईट वाटून घेऊ नका. 'भाव बढेंगे तो ही हम बचेंगे', हे तुम्हाला एव्हाना कळालं असेलच. चिंता करू नकाङ्क पुढील निवडणुकीच्या पूर्वसंध्येला आम्ही पुन्हा एकदा गॅस दर कमी करू व सामान्य माणसाच्या हितासाठी तुमचं मत मिळवण्याचा पुरेपूर प्रयत्न करू, तुमचं लाडकं, (महागाईच्या गोदीत बसलेलं) मोदी सरकार.'

असा मजकूर या पत्रात लिहिला आहे. या पत्रातून शरद पवार गटाने मोदी सरकारवर टीका केली आहे. मोदी सरकारच्या धोरणावर शालजोडीतून राग, संताप व्यक्त केला आहे. मोदी सरकार जनतेची दिशाभूल करत असल्याचा आरोप या पत्रातून करण्यात आला आहे. या पत्रातून मोदी सरकारला चिमटे काढण्यात आले आहेत. मोदी सरकारकडून घरगुती गॅस सिलेंडरच्या किंमतीत 50 रुपयांची दरवाढ लागू करण्यात आली. 8 एप्रिल, आजपासून ही दरवाढ लागू करण्यात आली आहे.

# राज्याचे वाळू धोरण जाहीर

## ग्रामपंचायत, जि.प. आणि पंचायत समितीसाठी मोठा निर्णय

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्य मंत्रिमंडळाची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज (मंगळवार) संपन्न झाली. या बैठकीत राज्याचे वाळू धोरण जाहीर करण्यात आले आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे.



तसेच महसूल विभागाअंतर्गत सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित धोरण विशेष अभय योजनाही राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीतील महत्त्वाचे ९ निर्णय पुढीलप्रमाणे...**

1) नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व पुणे या महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दीतील शासकीय जमिनी संबंधित प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणार, यातून विकास कामांना वेग येणार (नगर विकास)

2) राज्याचे वाळू- रेती निर्गती धोरण-2025 जाहीर (महसूल)

3) महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा निर्मुलन व पुनर्वसन) अधिनियम-१९७१ मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय; झोपडपट्टी पुनर्वसनाला गती मिळणार (गृहनिर्माण)

4) वांद्रे रिक्लेमेशन व आदर्श नगर (वरळी) या दोन म्हाडा अभिन्यासातील इमारतींचा उ&ऊ मार्फत एकत्रित पुनर्विकास करण्याचा निर्णय (गृहनिर्माण)

5) सिंधी विस्थापितांचे पट्टे नियमित धोरण विशेष अभय योजना-2025 (महसूल)

6) नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करण्यात येणार (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)

7) खाजगी अनुदानित आयुर्वेद व खाजगी अनुदानित युनानी संस्थांमधील गट-ब, क व ड संवर्गातील शासन मंजूर पदावरील शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी यांना पूर्वलक्षी प्रभावाने एक व दोन लाभांची 'सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना' लागू करण्याचा निर्णय (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

८) शासकीय आयुर्वेद / होमिओपॅथी / युनानी / योग व निसर्गोपचार महाविद्यालयांतील कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरावयाच्या अध्यापकांचे दरमहा एकत्रित ठोक मानधन निश्चित (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये)

9) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमात सुधारणा

# स्वातंत्र्य सेनानी संदिपान गायकवाड स्मृतिदिनी महाआरोग्य शिबिराचे आयोजन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड यांच्या स्मृतिदिनानिमित मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन व स्वातंत्र्य सेनानी स्व. संदिपानदादा गायकवाड कृषिरत्न पुरस्कार वितरण करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष डॉ. कौशिक गायकवाड यांनी मोहोळ नागरी पतपुरवठा संस्थेत झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

या महाशिबिराचे उद्घाटन न्यायाधीश जयराज वडणे यांच्या हस्ते तर अमेरिकेच्या टेक्सास विद्यापीठाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.सुहास व्यवहारे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून स्वातंत्र्य सेनानी संदिपानदादा गायकवाड कृषिरत्न पुरस्काराचे वितरण महाराष्ट्र राज्य सहकार परिषदेचे अध्यक्ष राजन पाटील यांच्या हस्ते तर रोटरी क्लबचे जिल्हा संचालक वसंतराव




मालुंजकर यांच्या अध्यक्षतेखाली सायंकाळी सव्वा पाच वाजता होणार आहे.

मोहोळ येथे स्वातंत्र्य सेनानी संदिपानदादा गायकवाड बहुउद्देशीय व संशोधन संस्था व रेड स्वस्तिक सोसायटी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने संदिपान दादा गायकवाड यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत स्वातंत्र्य सेनानी संदिपानदादा गायकवाड सभागृह येथे मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या

**शिक्षण आणि आरोग्य सुविधांवर भर**

शिक्षण आणि आरोग्यविषयक सोयी सुविधा असणे काळाची गरज आहे. महाआरोग्य शिबिरामध्ये राज्य शासनाच्या योजनेत न बसणाऱ्या आजार तपासणीसह शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहे. कॅन्सरसारख्या आजाराची गावागावात जाऊन तपासणी करण्यात येणार आहे. जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी आरोग्य, शिक्षण सुधारणाकडे संस्थेचा प्रयत्न राहणार आहे.

**-डॉ. कौशिक गायकवाड,** संस्थापक अध्यक्ष

महाआरोग्य शिबिरात हृदय, मेंदू, मणके, यकृत, किडनी, अर्धांग वायू, ब्रेनस्ट्रोक, स्त्रीरोग, नेत्र, कृत्रिम अंग प्रत्यारोपण, तपासणी व उपचार शस्त्रक्रियासह बीपी, शुगर, थायरॉइड, ईसीजी, रक्ताच्या सर्व चाचण्याही विनामूल्य केल्या जाणार आहेत.

या महाशिबिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेमध्ये न बसणाऱ्या योजनेतील रुग्णांवर उपचारासह शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. या शिबिराच्या माध्यमातून पुढील काळात संपूर्ण मोहोळ तालुक्यातील प्रमुख गावांमध्ये जाऊन तपासणीसह उपचार करण्यात येणार आहेत. तरी पंचक्रोशीतील सर्व गरजू रुग्णांनी या महाआरोग्य शिबिराचा लाभ घेण्यासाठी राकेश असे आवाहन डॉ.कौशिक गायकवाड यांनी केले.

याप्रसंगी चंद्रमोळी पतसंस्थेचे चेअरमन राजेश खपाले, चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष नाना डोके, उपसरपंच विजय कोकाटे, श्रीकांत गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, अनिल नाईक, शैलेश गावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# सोलापूर विभागाला हव्यात शंभर गाड्या, मिळाल्या केवळ ३५

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर विभागात सुमारे साडे सहाशे बस सुरू आहेत. यापैकी बऱ्याच बस जुन्या आहेत. यामुळे सोलापूर विभागाने शंभर नवीन बसची मागणी केली आहे. यापैकी आतापर्यंत केवळ ३५ बस मिळाल्या आहेत.



जिल्ह्यात गतवर्षी ठाणे जिल्ह्यातील शंभर जुन्या बस देण्यात आल्या होत्या. या सर्व बस जवळपास पंधरा वर्षे पूर्ण होत आलेल्या असल्याने कुठेही बंद पडत असत. दुरवस्था झालेल्या जुन्या बस सेवेत असल्याने प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजी व्यक्त होत होती.

१९ फेब्रुवारी रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचा सोलापूर दौरा झाला. या दौऱ्यात त्यांनी दरवर्षी पाच हजार नवीन बसची खरेदी करणार व पाच वर्षात २५ हजार नवीन बस खरेदी करणार असल्याचे सांगितले होते. मागील अनेक दिवसांपासून सोलापूर विभागासाठी नवीन १०० बसची मागणी नोंदविलेली आहे. यापैकी ३५ बस आतापर्यंत सोलापूर विभागाला मिळाल्या आहेत.

**नवीन पाच बसचे लोकार्पण**

सोमवारी सोलापूर आगारात नवीन पाच बस दाखल झाल्या. मध्यवर्ती बस स्थानकात नव्याने दाखल झालेल्या लालपरीचे लोकार्पण आमदार विजय देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, सोलापूर विभागाचे प्रमुख अमोल गोंजारी, उपयंत्र अभियंता संजय चव्हाण, आगार व्यवस्थापक नागनाथ जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

आज सोलापूर आगारात नवीन बसचे लोकार्पण झाले. या बस मुंबई, ठाणे व नाशिक मार्गावर धावणार आहेत. तसेच आणखी पाच बस सोलापूर आगाराला मिळणार आहेत.

**- अमोल गोंजारी,** विभाग नियंत्रक, सोलापूर

# महिला सावकाराच्या घरी सहकार विभागाची धाडः गुन्हा दाखल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** हगलूर (ता. उत्तर सोलापूर) येथील राणी मोहन जाधव यांच्या घरी सहकार विभागाने टाकलेल्या धाडीत अवैध सावकारीशी निगडित करार, बॉण्ड व हिशेबाच्या डायऱ्या आढळून आल्या आहेत. उत्तर सोलापूर सहाय्यक निबंधक कार्यालयातील मुख्य लिपिक प्रिया राजेंद्र संकद यांनी दिलेल्या फियार्दीवरून राणी जाधव यांच्यावर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ त्याखालील नियम २०१४ प्रमाणे अवैध सावकारीच्या अनुषंगाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समर्थ दशरथ शिंदे (रा. हगलूर, ता. उत्तर सोलापूर) यांच्या अर्जावरून जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड व उत्तर सोलापूरचे सहाय्यक निबंधक दत्तात्रय भवर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आज सकाळी ७.३० वाजता पथक प्रमुख पी. आर. संकद, ए. एस. पुजारी, व्ही. जे. गौड, एस. बी. कासार, पंच क्र. १ रामदास मादगुंडी, एन. एन. बल्ला, पोलिस हेड कॉन्स्टेबल रहीम इलाही सय्यद, महिला पोलिस कॉन्स्टेबल कविता वंजारी या पथकाने जाधव यांच्या घराची झाडाझडती घेतली.

यात जाधव यांच्या घरातील लोखंडी कपाटात एका छोट्या डायरीत स्टॉकिस्ट प्रगती एजन्सीज ६६६, फलटण गल्ली, सोलापूर यामध्ये सुरुवातीच्या दोन पानांवर रक्कम व दिनांक व्याज, महिने असे नमूद आहे. राजश्री सिमेंटची छोटी डायरी ज्यामध्ये सुरुवातीच्या पहिल्या पानावर दिनांक विरहित व्याज, मुद्दल व रक्कम अशा ७ नोंदी नमूद आहेत. ५०चे दोन स्टॅम्पवरील करारनामेही सापडले आहेत. राणी मोहन जाधव (रा. हगलूर, ता. उत्तर सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

# एआय तंत्रज्ञानाव्दारे वारीत होणार गर्दीचे व्यवस्थापन

## वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए. आय तंत्रज्ञानाचा वापर

**पंढरपूर,(कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर महाराष्ट्राचे आराध्यदैवत व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी दररोज हजारो भाविक येतात. तसेच आषाढी, कार्तिकी, चैत्री, माघी या चार प्रमुख यात्रेला लाखो भाविक पंढरीत येतात. या यात्रा कालावधीत पंढरपूर शहरात प्रामुख्याने चंद्रभागा वाळवंट, नदीपात्र, भक्ती सागर परिसर, मंदिर परिसर, दर्शन रांग, प्रदक्षिणा मार्ग, शहरातील रस्ते या भागात वारकरी- भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. या गर्दीचे व्यवस्थापन करण्यासाठी आता कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआय तंत्रज्ञानाचा वापर होणार असून, एआय तंत्रज्ञान वापराबाबतची चाचणी आज पंढरपूर बसस्थानक येथून घेण्यात आली.



वारीत गर्दीच्या व्यवस्थापनासाठी वापरण्यात येणाऱ्या एआय तंत्रज्ञानाची चाचणी आज पंढरपूर येथील बसस्थान येथून घेण्यात आली यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, प्रशिक्षित आय.पी.एस अधिकारी अंजना कृष्णन, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, विक्रांत गायकवाड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले, ड्रोन आयडीया फोर्चचे एजीएम आशिष माथूर उपस्थित होते.

श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी वर्षाकाठी पंढरपूरात एक कोटीहून अधिक भाविक येत असतात. आषाढी यात्राकाळात मानांच्या पालख्यांसह अनेक दिंड्या पायी पंढरपूरला येत असतात. यात्रा काळात भाविकांना सुरक्षित आणि सुलभ दर्शन मिळावे, कुठेही अनुचित प्रकार घडू नये. यासाठी प्रशासनाकडून एक महिना अगोदरच तयारी केली जाते. आता प्रत्येक वर्षी होणाऱ्या सोहळ्यात गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ए. आय तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली या माध्यमातून सुरक्षित गर्दी व्यवस्थापन ही संकल्पना राबवली जाणार आहे. या तंत्रज्ञानाव्दारे गर्दीचे प्रमाण, गर्दीची घनता मोजता येणार आहे. चेहऱ्याची ओळखी द्वारे हरवलेली अथवा मदतीची गरज असलेले लोकांची माहिती, ऑब्जेक्ट शोधणे त्यांच्या हालचालींचे विश्लेषण देखील करता येईल. गदीर्ची वाढलेली घनता लक्षात येताच तत्काळ सूचना मिळेल व त्या ठिकाणी सुरक्षेबाबत उपाययोजना राबवता येतील असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले यांनी दिली.

स्वातंत्र्यसेनानी संदिपान दादा गायकवाड बहुउद्देशीय व संशोधन संस्था , मोहोळ , जिल्हा सोलापूर , महाराष्ट्र ( रजि.) व रेड स्वस्तिक सोसायटी यांचा संयुक्त उपक्रम

**भव्य मोफत आरोग्यतपासणी व रोगनिदान महाशिबिर - 2025**
**( विनामूल्य तपासणी , उपचार , औषधे व शस्त्रक्रिया )**

RED SWASTIK ek aarogya abhiyan...

हृदयरोग | यकृत | किडनी | मेंदू | मनके | अर्धांगवायू | स्त्रीरोग | ब्रेनस्ट्रोक | नेत्र | रक्तदाब | मधुमेह | थायरॉईड | कृत्रिम अंग ( हात - पाय ) प्रत्यारोपण

**सहभागी नामवंत डॉक्टर्स व हॉस्पिटल्स**

जहांगीर हॉस्पिटल , पुणे
Dr. Ashok B. Ghone ( Senior Honorary Consultant & HOD , Social Services )
Dr. J. S. Dugal ( Senior Cardiologist )
Dr. Ram Patil ( Consultant Head & Neck , Surgical Oncologist )
Dr. Mandar Patil ( DNB , Neuro Surgeon Consultant )




निरामय पॅरालिसिस सेंटर अँड फाऊंडेशन , पुणे
Dr. Sunil Salve

एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय मोहोळ केंद्र , सोलापूर
Dr. Manjiri Patil Optometrist

मॅक्सकेअर मल्टिकेअर हॉस्पिटल , वैराग , सोलापूर
Dr. Pravin Masal ( DGO , Gynaecologist & Obstetrician )

• रुग्णांनी महाशिबिराला येतांना जुने रिपोर्ट्स व हॉस्पिटल्सच्या फाईल्स सोबत आणाव्यात .
• वरील सर्व आजारांवर उल्लेखित नामवंत हॉस्पिटल्सच्या सुविधा विनामूल्य लाभणार आहेत .

मोफत आरोग्यशिबिराचा लाभ घ्या

महाशिबीर दिनांक : 12 एप्रिल , 2025 ( शनिवार ) || वेळ : सकाळी 9 ते संध्याकाळी 5 वाजेपर्यंत
स्थळ : स्वातंत्र्यसेनानी संदिपान दादा गायकवाड सभागृह , सोलापूर रोड ,मोहोळ , तालुका मोहोळ , जिल्हा सोलापूर

मोफत आरोग्यशिबिराचा लाभ घ्या

नाव नोंदणीसाठी संपर्क

| श्री. राकेश देशमाने | श्री. शैलेश गावडे | श्री. अनिल नाईक | श्री. विजय कोकाटे | श्री. मुस्ताक शेख |
|---|---|---|---|---|
| +91 96899 57196 | +91 98503 45773 | +91 98600 24622 | +91 98905 94577 | +91 98606 59586 |

## संपादकीय

# उच्च शिक्षित बेरोजगारी

इंजिनिअर खोऱ्याने तयार झालेले आहेत आणि त्यांना आता जॉब मिळणे मुश्कील झाले आहे हे या रिपोर्टवरून समजू शकते. मध्यंतरी एक अहवाल आला होता की ज्यात 50 टक्क्यांपेक्षा अधिक इंजिनिअर हे कामाचेच नाहीत. काम आहे की नाही हा इश्यू नंतरचा. मुळात ते कामाचेच नाही असं तो अहवाल दाखवत होता. या सर्व प्रश्नाला अनेक प्रकारचे पैलू आहेत सामाजिक, राजकीय, आर्थिक तसेच औद्योगिक. सामाजिक बाबतीत म्हणाल तर आजही कित्येक लोकांना इंजिनिअर म्हणून एक वलय कमीत कमी नावाला तरी वाटू लागलेले आहे. भले तो काय करतो हा नंतरचा विषय. त्यामुळे घरातलेही मारून मुटकून इंजिनिअरिंगला पाठवतात. काही ठिकाणी तर इंजिनिअर म्हटलं की पुढे मुलाचा हुंडा मिळतो. हुंडा पद्धती कागदावर कुठेही नाही हे माहिती आहे, तरी समाजात काय आढळून येत हेही सगळ्यांना माहिती आहे. ते सगळं एक ओपन सिक्रेटच आहे. त्यामुळे आपला मुलगा, मुलगी इंजिनिअर व्हावं अगदी त्याला कितीही मार्क असतील तरीही इकडे तिकडे धावाधाव करून डोनेशन देऊन या सामाजिक तथाकथित स्तराकरता इंजिनिअर बनवण्याचा कित्येकांचा अट्टहास असतो.

आता राजकीय बाजू म्हणाल, तर तुम्हाला माहिती आहे राजकारणी कुठेही शिरत नाहीत? जिथे मालामाल होता येईल तिथे ते घुसणारच. अशामुळे अंगठेबहादर (शब्दशः तसे नसले तरी शिकवण्याच्या बाबतीत नक्कीच) लोक शिक्षणसम्राट होऊ लागलेले आहेत. सत्तेपुढे शहाणपण नसल्यामुळे त्यांच्या मनाला वाटेल तसे ते कॉलेजेस काढू लागलेले आहेत आणि त्यातून कोणते इंजिनिअर निर्माण होतात ते आपण पाहत आहोतच. बरं तिथे असलेला स्टाफही त्याच प्रकारचा असतो. त्यांना काही सोयी सवलती नसतात. थोडक्यात, ते पॉश वेठबिगारी असं म्हटल्यास अयोग्य ठरणार नाही.

शिक्षणाला ज्यावेळी व्यवसाय म्हणून पाहण्याची दृष्टी सुरू झाली त्याचवेळी शिक्षणाचा दर्जा खालावला गेलेला आहे. महात्मा गांधींनी शिक्षणाची अतिशय सोपी व्याख्या सांगितली होती 'शिक्षण म्हणजे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होय'. आज आपण पाहतो की दहावी-बारावीतील केवळ पर्सेंटेज पाहूनच पुढे जातात. त्यानंतरही सीईटी किंवा स्पर्धा परीक्षेचा याचं एवढं मोठं अवडंबर आहे की त्याच मार्गात लोक पुन्हा पकडले जातात. त्यावर ॲडमिशन निश्चित केलं जातं. जसं जसं पुढे जाऊ तसे तसे चांगली कॉलेजेस कमी होत असल्यामुळे ही स्पर्धा भयानक वाढत आहे.

मग अनेक क्लासेस जे विद्यार्थ्यांना त्या सीईटीच्या परीक्षेला पास करण्यात मदत करतात. थोडक्यात, त्यांना परीक्षार्थी करतात. त्याला काय स्पर्धा येतं, येत नाही यापेक्षा तो स्पर्धा परीक्षा कशी पास होईल त्याच्याकडे लक्ष केंद्रित केले जाते. त्यासाठी वारेमाप फी ही आकारली जाते व ते देणारेही आहेत कारण सामाजिक पत? अशामुळे महात्मा गांधींनी दिलेल्या शिक्षणाची व्याख्या जरी असली तरी त्यातील 'सर्वांगीण' हा शब्द हळूहळू पुसला जात आहे. केवळ व्यक्तीचा विकास, कसला गुण कमावण्याचा विकास पाहिला जात आहे. हा असा विकास मग सगळं भकास करतो.

आता आर्थिक पैलू पाहू. पूर्वी उच्च शिक्षण घ्यायला केवळ श्रीमंत लोक जायचे. म्हणजे गरीब जरी हुशार असला तरी त्याला खूप कष्ट असतात. म्हणजे त्याला ॲडमिशन जरी मिळाले तरी तिथे पुढचा खर्चही त्याला झेपत नसे अशी परिस्थिती होती. पण आता चित्र पूर्णपणे पालटलं गेलं आहे. श्रीमंत तर कसाही जाऊ शकतो तो आता हुशार असला पाहिजे असं नाही. पण यात मुख्य धोका असा आला आहे की त्यामानाने गरीब असणारे पण तरीही डोनेशन देऊन, शिक्षणासाठी कर्ज घेऊन मारून मुटकून विद्यार्थ्यांना इंजिनिअर करण्याच्या मागे आहेत. केवळ गरिबीमुळे शिक्षण राहू नये, असा उदात्त विचार असला तरी त्यातून आता वेगळच फायदा घेतला जात आहे. उठ सुठ जो तो अगदी सुमार असला तरीही तो इंजिनिअर, डॉक्टर बनण्याच्या मागे आहे. कॉलेजला भरमसाठ फी लागते त्यासाठी बँक आहे. कॉलेज पाहून लगेच लोन पास करत आहेत.


अशा खासगी पेव फुटलेल्या कॉलेजमध्ये अत्यंत विदारक परिस्थिती असते. कित्येक वेळेला त्यांचे स्टाफ व इतर सहाय्यक लोक यांनाही त्यांचे वेतन वेळेवर व जे ठरवलेले आहे तसे कायद्याप्रमाणेही मिळत नाही. मध्यंतरी तशी बातमी आली होती की चेक जरी दिला तरी नंतर त्यांना पैसे आणून द्यायला सांगत, अशीही काही ठिकाणी परिस्थिती होती. म्हणजेच खासगी महाविद्यालय ही केवळ पदवी छापून देण्याचा कारखाना ठरू पाहात आहे.

आता आपण औद्योगिक पैलू पाहू. शेवटी उद्योजक हे त्यांचा फायदा करण्याकरता कंपनी वा व्यवसाय करीत असतात. पूर्वी कमीत कमी पगार देऊन ते कामावर घेण्याचा प्रयत्नही करत असत. आताही काही ठिकाणी होत आहे; पण आता बरेच ठिकाणी पगाराबाबतीत काही विशेष समस्या राहिलेली नाही. चांगल्या कंपन्यांमध्ये जर का व्यक्तीला व्यवस्थित काम असेल, तर त्याला चांगले वेतन दिले जात आहे. अगदी हुशार विद्यार्थ्यांना कॅम्पसमधूनच चांगल्या वेतनावर घेतले जात आहे. पण एकूण विद्यार्थ्यांच्या मानाने ती संख्या अत्यंत अल्प आहे. मग उरलेले इंजिनिअर अनेक ठिकाणी जे मिळतील तेही जॉब स्वीकारताना आपण पाहत आहोत. आज बँकेच्या स्पर्धा परीक्षांमध्ये किंवा अशा अनेक जागा जिथे केवळ पदवी हवी आहे तेथे बघा इंजिनिअर लोकांची संख्या भरपूर दिसून येते. हाडाचे शिक्षक गेले तसे हाडाचे इंजिनिअरही रसातळाला जाऊ लागलेले आहेत. खरोखर ज्यांच्यात कला आहे किंवा आर्थिक बाबीचे ज्ञान आहे अशा बीए, बी.कॉम हवं आहे अशा ठिकाणी इंजिनियर घुसू लागलेले आहेत.

आपण आता एक वेगळी बाजू पाहू. शिक्षण सम्राट हे शिक्षणाकडे सेवा वगैरे न पाहता व्यवसाय म्हणून पहात आहेत. ठीक आहे मग त्या व्यवसायात त्यांनी येणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याप्रमाणे चांगले घडवून दाखवावे व त्यांना त्यांच्या पायावर पुढे उभे करणे ही जबाबदारी घ्यावी. उद्योग धंदा व चांगल्या नोकऱ्या मिळतील असे त्यांनी उभे करून दाखवावे व त्याची त्यांनी गॅरंटी घ्यावी. खासगी कॉलेजांना व्यवसाय म्हणून त्यातील पैसा हवाय पण त्याचे नंतर त्या विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्याची जबाबदारी नको. असाच दुटप्पीपणा चालू आहे. सुरुवातीला कॉलेजांची आवश्यकता होती हे मान्य. पण आता तो फुगा एवढा फुगलेला आहे की अनेक कॉलेजांत दरवर्षी जागा रिकाम्या राहत आहेत. सरकारने याबाबतीत कठोर नियमावली करून काहीतरी मार्ग काढणे आवश्यक आहे. म्हणजे काही कॉलेजांची परवानगी रहित करणे वगैरे. कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या 50 हजार जागा जर रिक्त राहत आहेत तर इतर कॉलेजमध्ये तरी त्याची भरती होऊ लागेल. शिक्षण देत असताना केवळ अध्ययन म्हणून नव्हे तर वैयक्तिक किंवा सर्वांगीण विकास कसा होईल हे पाहणे सर्वच कॉलेजांना आवश्यक आहे. यातूनच नवी पिढी बोध घेऊ शकते. विद्यार्थ्यांना डोके नसते असे नाही फक्त ते व्यवस्थित शोधून घेणे व त्याप्रमाणे त्याला आवश्यक ती मदत करणे जेणेकरून या व्यावसायिक जगात तो विद्यार्थी उत्तुंग झेप घेऊ शकेल. तो अशी झेप घेईल की ती घेतल्यावर तो अनेक विद्यार्थ्यांनाही त्याच्या व्यवसायात सामील करून घेऊ शकेल. नोकरी मिळवण्यापेक्षा नोकरी निर्माण करणाऱ्या इंजिनिअरची येथे अधिक आवश्यकता आहे. त्याच दृष्टीने सरकार दरबारातील व्यक्तींनी यात विशेष लक्ष घालून पुढील पिढीसाठी योग्य तो रोड मॅप करावा.

# राज्यातील धर्मादाय रूग्णालयावर सरकारने करडी नजर ठेवून; गरीब व सर्वसामान्यांसाठी योग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाने पैशाअभावी उपचार नाकारल्याने तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप तिच्या नातेवाईकांनी केला होता.त्यामुळे या प्रकरणाची चौकशी करण्याचा निर्णय आरोग्य विभागाने घेतला आहे.पुणे येथील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्याने प्रसूतीदरम्यान महिलेचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी धर्मदाय सह आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले आहेत.पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणावरून पुण्यात रूग्णालयाच्या बाहेर विविध संघटनांकडुन आंदोलन करण्यात आले होते.असे सांगितले जाते की १० लाख रुपये जमा न केल्यामुळे महिलेला रूग्णालयात भर्ती करण्यास रूग्णालय प्रशासनाने मनाई केल्याचे सांगितले जाते.यानंतर त्या महिलेने दोन जुळव्या मुलांना जन्म दिला व तीचा यात मृत्यू झाला.यावर राज्य शासनाने ताबडतोब घटनेची गांभीयार्ने दखल घेतली व या प्रकरणातची चौकशी करण्यासाठी पाच जणांची समिती गठीत करण्यात आली आहे.यानंतर आता रूग्णालयाकडून एक पत्रक जारी करण्यात आले असून यानंतर रूग्णांकडून डिपॉझिट घेतले जाणार नसल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात अनेक प्रकारचे उपचार रूग्णांवर होतात.त्यामुळे सर्व चूक रूग्णालयाची आहे असे म्हणून चालणार नाही.परंतु या केसमध्ये नक्कीच असंवेदनशीलपणा दाखविण्यात आला आहे ही बाब तेथील झालेल्या घटनेवरून स्पष्ट दिसून येते. कारण गर्भवती महिलेचा मृत्यू अंगावर शहारे येणारा आहे. त्यामुळेच तेथील नागरिक किंवा आप्त आक्रमक झालेत. कोणतेही रूग्णालयात असो रूग्णालयात येणारा प्रत्येक व्यक्ती आपल्या वेदना घेऊन येत असतो.कारण कोणत्याही रूग्णांची आपात्कालीन प्रकृती खराब झाली तर आपल्या परिस्थितीनुसार खाजगी किंवा सरकारी किंवा धर्मदाय रूग्णालयाकडे धाव घेऊन रूग्णांवर आपात्कालीन परिस्थितीत ताबडतोब उपचार व्हावेत अशी इच्छा संपूर्ण रूग्णांच्या नातेवाइकांची असते. अशा परिस्थितीत रूग्णांचे परिवार आपल्या ऐपतीप्रमाणे पैसा गोळा करून त्या-त्या रूग्णालयात उपचार घेतात.परंतु आपण जेव्हा धर्मदाय रूग्णालयाची परिभाषा करतो तेव्हा आपात्कालीन परिस्थितीत कोणताही रूग्ण असो त्यावर रूग्णालय प्रशासनाने ताबडतोब उपचार करायला हवेत. कारण हा जिवन मरणाचा प्रश्न असतो.कारण यात थोडीशी चूक किंवा वेळ झाला तर तो रूग्ण दगावतो आणि हाच प्रकार दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात झाला.आपण डॉक्टरांना दैवी शक्ती असल्याचे मानतो त्याचपध्दतीने रूग्णालय प्रशासनाने तत्परता दाखविने गरजेचे असते. रूग्णालयाला सुध्दा अनेक अडचणींचा सामना करावा लागतो यात दुमत नाही.कारण स्टाफ कमी असने अशाप्रकारे अनेक अडचणी त्यांच्या समोर सुध्दा असु शकतात यालाही नाकारता येत नाही. परंतु दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या अशा घटनांमुळे राज्यात एक वेगळाच संदेश जातो.कारण राज्यात तब्बल ४७६ धर्मदाय रूग्णालये (ट्रस्ट हॉस्पिटल) आहेत. त्यामुळे आता आरोग्य विभाग व सरकारची जबाबदारी आहे की या संपूर्ण रूग्णालयाची काय अवस्था आहे किंवा रूग्णालय प्रशासनाच्या काय-अडचणी आहेत किंवा या रूग्णालयात येणाऱ्या रूग्णांवर योग्य उपचार होतो की नाही किंवा हयगय तर होत नाही ना!या संपूर्ण गोष्टींवर आता सरकारने करडी नजर ठेवण्याची गरज आहे.या संदर्भात माननीय मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सर्वांना आश्वस्त केले की भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी एक निश्चित कार्यपद्धती (एसओपी) तयार करण्याचे काम सुरू आहे.याचे मी मनापासून स्वागत करतो.कारण पुढे अशा घटना होणार नाही याची ताबडतोब दखल मुख्यमंत्री महोदयांनी घेतली. पुण्यातील घटना पहाता राज्यातील संपूर्ण सरकारी रूग्णालयाने, निमसरकारी रूग्णालयाने, धर्मदाय रूग्णालयेसह खाजगी रुग्णालयांनी आपात्कालीन परिस्थितीत रूग्णांना सवोतीपरी मदत केली पाहिजे. कारण सध्याच्या परिस्थितीत खाजगी रुग्णालये मोठ्या प्रमाणात पैसा वसूल करतात यावर सुध्दा सरकारने अंकुश लावने गरजेचे आहे.कारण शेवटी माणूस हा माणूस असतो त्यामुळे धर्मदाय रूग्णालयांसोबतच खाजगी रुग्णालयांनी सुध्दा माणुसकी या नात्याने गरीब-निर्धन व सर्वसामान्यांना सवलतीच्या दरात उपचार उपलब्ध करून दिले तर ही खरी मानव सेवा समजली जाईल.कारण महागाईच्या काळात गरीब व सर्वसामान्यांना सर्वच बाबतीत मोठी कडवी झुंज द्यावी लागते या संपूर्ण परिस्थितीचा विचार करून संपूर्ण रूग्णालयांनी माफक दरात उपचार करण्यास स्वतःहुन तत्परता दाखवली तर अनेकांना जिवदान मिळेल व डॉक्टरांची दैवी शक्ती दिसून येईल.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

## प्रबोधन

# दुसरे ते गांधी। वंदनीय कधी

अजब तुझे सरकार। उद्धवा अजब तुझे सरकार। लबाड जोडिती इमले माड्या। गुणवंतांना मात्र झोपड्या। पतिव्रतेच्या गळ्यात धोंडा। वेश्येला मणिहार।। हे गदिमालिखित गीत जुनं झालं असलं, तरी त्याचा आशय मात्र चिरकाल जसाच्या तसा राहाणारा आहे. तो जुना होणार नाही. भविष्यकाळात जर एखादी समाजपरिवर्तनाची त्सुनामी आली, तरच वरील गाणं बाद होईल, अन्यथा हे भारताचं अक्षय रडगाणं असेल. महात्मा गांधीजींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलं, पण भारतीय जनतेचं दारिद्य हे त्यांच्या काळजाचं दुखणं होतं.

स्वराज्याच्या चळवळीत ते यशस्वी झाले, पण त्यामुळे ते स्वस्थ बसणार नव्हते. स्वराज्याचं सुराज्यात, सुखी राज्यात, रामराज्यात परिवर्तन करण्याचा त्यांना ध्यास लागला होता. म्हणून तर त्यांनी श्रीमंतांचा उल्लेख संपत्तीचे विश्वस्त (trustee) असा केला, मालक असा केला नव्हता. नथुराम गोडसे याने त्यांची हत्या करून भावी देशहिताचीच निर्घृण हत्या केली. अन्यथा आर्थिक समतेसाठी हा महात्मा प्राणपणाने लढला असता. आर्थिक गुलामीतून भारतीय दरिद्री नारायणाला त्यांनी नक्की मुक्त केलं असतं.

जगाच्या दृष्टीने आज भारत हा अविकसित देश आहे. कारण भारतीय माणसाचं दरडोई उत्पन्न लक्षातही घेता येणार नाही इतकं कमी आहे. अत्यंत खालावलेल्या परिस्थितीत जगणारा भारत हा पुढारलेल्या देशांच्या दृष्टीने तुच्छतेचा विषय आहे. भारतावर ज्यांनी ज्यांनी आक्रमणं केली; त्यांनी त्यांनी देशाची संपत्ती लुटली. त्यात मुस्लीम देशातली लुटारू जसे होते; तसे युरोपियनही लूट करीत होते. पण त्यामुळे देशाची बहुसंख्य जनता कंगाल झालेली नाही. तिच्या दारिद्याला स्वदेशी राजे-महाराजे, शेठ-सावकार, जमीनदार-वतनदार शास्त्री - पंडित-पुरोहित हेच कारणीभूत झालेले होते. हे सारे स्वदेशी, देशबंधू म्हणवून घेणारे लुटारू होते आणि त्यांना मनुस्मृतीसारख्या ग्रंथांनी विषमता वाढवण्याचा परवानाच दिला होता. शूद्रांना स्मृतिग्रंथांनी संपत्तीचा अधिकार नाकारला होता. विद्येचा अधिकार नाकारला होता, सामाजिक अधिकार नाकारला होता आणि त्यांना दोन पायांच्या जनावरात जमा केलं होतं.

छत्रपती शिवरायांच्या कारकीर्दीपर्यंत भारतात वतनदार हेच राजे होते. 'खलक खुदाका, मुलुक बादशहाका, राज्य अंगरेज सरकारका' अशी एक मार्मिक लोकोक्ती भारतात रूढ होती. पण त्याआधी आणि नंतरही गरिबांच्या हालअपेष्टांमध्ये काही फरक पडला नाही. छत्रपती शिवरायांनी वतनदारी आणि देशमुखी नाहीशी केली. पण त्यांच्यानंतर पुन्हा येरे माज्या मागल्या म्हणून पूर्वीचीच धोरणं राबवली गेली. परिणामी, गरीब गरीबच राहिले आणि श्रीमंत अधिक श्रीमंत होत गेले. इच्छा असूनही विषमतेची दरी कायमची मिटवणं कोणाला शक्य झालं नाही. आचार्य विनोबा भावे यांनी भूदानयज्ञ चळवळ चालू करून जमिनीवरील जमीनदारांचे हक्क संपुष्टात आणण्याचा अहिंसक प्रयोग केला होता. तो यशस्वी झाला नाही आणि हा प्रयोग जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या नेत्यानेही नेटाने पुढे नेला नाही, हे देशाचं दुर्दैव!

म्हणूनच आज भारताच्या उत्थानासाठी महत्त्वाचा आणि अग्रीम विषय संपत्तीची आणि जमिनीची समान वाटणी हाच असला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय लोकशाहीपेक्षा सामाजिक लोकशाही, आर्थिक समतेच्या स्थापनेसाठी आवश्यक मानली. बाबासाहेब म्हणतात, 'आपण लवकरात लवकर सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित केली पाहिजे.' इंदिरा गांधींनी गरिबी हटाव नारा दिला, पण तो आर्थिक-सामाजिक लोकशाहीच्या दिशेने दहा पावलंही टाकू शकला नाही. आज केवळ सत्तेचं राजकारण सुरू असल्यामुळे राजकीय सत्ताधीशांकडून जनता निराश झाली आहे. म्हणूनच जनतेमधून जो कुणी समाजोद्धारासाठी कटिबद्ध होतो, त्याला जनता मसीहा, दुसरे गांधी, देशोद्धारक मानून डोक्यावर घेते. पण अशा महापुरुषाला देशाच्या मूलभूत समस्या कोणत्या आणि त्या कोणत्याप्रकारे सोडवायच्या? याची प्रगल्भबुद्धी असणं आवश्यक आहे. देशात विषमतेचं थैमान चालू असताना शिक्षण, आरोग्य, भ्रष्टाचार हे विषय, विषमतेच्या निर्मूलनानंतर हातात घेण्यासाठी म्हणून तूर्तास (for the time being) बाजूलाच ठेवले पाहिजेत. गांधीजींना देश स्वतंत्र करावयाचा होता म्हणूनच त्यांनी आपली सर्व शक्ती स्वातंत्र्यसंग्रामाकडे लावली, इतर विषयांकडे नव्हे. म्हणून जर कोणाला महात्माजींचा, विनोबाजींचा वारसा चालवायचा असेल, त्याने सर्व शक्ती या देशात आर्थिक, सामाजिक लोकशाही आणण्यासाठी खर्च करावी. अशा व्यक्तीलाच दुसरा गांधी म्हणणं उचित ठरेल. यांसाठी कुणाला 'गांधी' म्हणण्याआधी देशस्थिती लक्षात घेतली पाहिजे. ती कशी आहे?-

खूप काही आहे। आहे ज्यांच्यापाशी
नाही त्यांच्यापाशी । काही नाही॥ १
आहे ते आहे का। योग्य सर्वभावे
'नाही' ते घडावे। कैसे 'आहे?' ॥२
'नाही' त्यांना नको। द्यायला का काही?
काळजी न घेई । त्यांची कोणी ॥ ३
सारे येऊ देत। एका पातळीत
अभावाचे गीत। अभद्र ते॥४
आर्थिक गुलामी। गरिबा छळते
दरिद्री राहाते। जिणे त्याचे॥५
स्वराज्यानंतर। सुराज्याचे ध्येय
करूनी निश्चय। साध्य करा।॥६
विषमता पैदा केली दैववादाने
खोटी तत्त्वज्ञाने। फेका दूर।॥७
आर्थिक समता। प्रस्थापि जो आधी
दुसरे ते गांधी। वंदनीय॥ ८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# वाढत्या महागाईच्या निषेधार्थ शासनाच्या विरोधात संभाजी ब्रिगेडचे निदर्शने



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नरेंद्र मोदी आणि भाजप सरकारने अच्छे दिनचे स्वप्न दाखवून सत्ता काबीज केली. पण गरिबांना दिवसेंदिवस महागाईचा सामना करावा लागत आहे. पेट्रोल डिझेलनंतर नुकतीच गॅसच्या दरात वाढ केल्यामुळे जनता महागाईत होरपळून निघत आहे त्यामुळे संभाजी ब्रिगेडच्या वतीने चार हुतात्मा चौकामध्ये महागाईच्या विरोधात निषेध आंदोलन करण्यात आले.

यावेळी अच्छे दिन अच्छी महंगाई या सरकारचे करायचे काय खाली मुंडी वर पाय. वा रे मोदी तेरा खेल, सस्ती दारू महंगा तेल. अशा घोषणा देण्यात आल्या.

पेट्रोल डिझेल गॅस सोबतच सर्व जीवनाशक वस्तूंची किमती वाढल्या आहेत सामान्य नागरिकांचे आर्थिक गणित पूर्णपणे बिघडले आहे. सर्वसामान्यांचे स्वयंपाक घरातील बजेट यामुळे बिघडणार आहे परिणामी महिलांमध्ये सरकार विरोधात पुन्हा एकदा नाराजी निर्माण झाली असून लाडक्या बहिणी दुखावल्या आहेत.

एकीकडे सरकार श्रीमंत आमदार खासदारांचे 25 टक्के पगार वाढ करते आणि गोरगरिबांना महागाईच्या खाईत लोटत आहे एकिकडे आणि आदणी अंबानी सारख्या उद्योगपतींचे लाखो कोटीचे कर्ज सरकार माफ करून सर्वसामान्य जनतेकडून वाढीव कर लावून जनतेची लुट करीत आहेत असा आरोप संभाजी ब्रिगेड च्या वतीने करण्यात आला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष राम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष मीनल दास शहराध्यक्ष मोनाली धुमाळ शहराध्यक्ष शिरीष जगदाळे शहर कार्याध्यक्ष प्रशांत देशमुख शहर सचिव सिद्धाराम साबळे शहर उपाध्यक्ष रमेश भंडारे शहर उपाध्यक्ष संतोष सुरवसे प्रसिद्धी प्रमुख सिद्धार्थ राजगुरू शहर उपप्रमुख फिरोज सय्यद वकील आघाडीचे जिल्हाप्रमुख गणेश कदम दिलीप निंबाळकर अभिषेक जहागीरदार राजनंदनी धुमाळ शहर कार्याध्यक्ष जयश्री जाधव शहर उपाध्यक्ष मनीषा कोळी आदी उपस्थित होते.

# भगवान महावीर जयंती निमित्त नातेपुते येथे रक्तदान शिबिर

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** रक्तदान हे एक महत्त्वाचे कार्य आहे ज्याने लाखो रुग्णाचे जीवन वाचवण्यास आणि परिवर्तन करण्यास मदत होत आहे रक्तदान ही दुसऱ्या माणसाला देऊ शकणारे सर्वात मौल्यवान वस्तू आहे.

नातेपुते येथे भगवान महावीर जयंती निमित्त राजवैभव मंगल कार्यालय या ठिकाणी रक्तदान शिबिर घेण्यात आले.चंद्रप्रभू मंदिर ट्रस्टचे ट्रस्टी राजमहेंद्र दोशी, वर्धमान दोशी, बाहुबली चंकेश्वरा, डॉ. सविता गांधी, महावीर गांधी यांच्या हस्ते भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. रक्त संकलन करून घेण्यासाठी अक्षय ब्लड बँक सोलापूर यांनी त्या ठिकाणी नियोजन केले होते. ७५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

सदर रक्तदान शिबिराचा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी शैलेश दोशी, राहुल गांधी, हितेश दोशी, वैभव शहा, अमित शहा, विनय दोभाडा, अमित गांधी, प्रतीक दोशी, रोनक चंकेश्वरा, डॉ. विशाल दोशी, सोहिल दोशी, डॉ. अक्षय दोशी, डॉ. सनी गांधी, सुयोग दोशी, डॉ.तेजस चंकेश्वरा, सौरभ दोशी, महावीर सेना यांनी परिश्रम घेतले.

# कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालय बार्शी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालयाचा प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा प्रथम सत्रामधील परिक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये महाविद्यालयाची कु. घाडगे संध्याराणी प्रकाश या विद्यार्थीनींने 86.61% गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक संपादन केला. तर कु. बगाडे विमल संतोष या विद्यार्थीनींने 85.47% गुण मिळवत व्दितीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी सत्कार समारंभ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी प्रमुख पाहुणे श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार बापूसाहेब शितोळे उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी डॉ. शिंदे डी.बी., डॉ. शेंडे एस.एस., प्रा. बोनगे व्ही.ई., प्रा. जायभाय एम.बी., कार्यालयीन अधिक्षक मोरे टी.एस. व विद्यार्थी-विद्यार्थीनीं उपस्थित होते.

# पंढरपूर तालुक्यासाठी भरपूर विकास निधी उपलब्ध करून देणार - खा. प्रणिती शिंदे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** खासदार प्रणिती शिंदे यांनी सोलापूर लोकसभा मतदासंघांतील पंढरपूर तालुक्यातील नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन सोडविण्यासाठी शासकीय अधिकाऱ्यांना सोबत घेऊन गावभेट दौरा आयोजित केला असून शिरगाव, तावशी या गावाला भेट देऊन गावातील जनतेचे प्रणितीताई शिंदे यांनी निवडून दिल्याबद्दल आभार मानले व ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या आणि निवेदने स्वीकारले.

यावेळी नागरिक, शेतकरी बांधवांनी मांडलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागाचे शासकीय अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या.

आपल्या अनेक समस्या तत्काळ मार्गी लागल्याने व प्रश्नांचे निराकरण होत असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त करत आहेत

तसेच तावशी या गावात जिल्हा वार्षिक योजना सन २०२४ - २०२५ अंतर्गत खासदार प्रणिती शिंदे यांच्या खासदार निधीतून २०१५/१४१६ अंतर्गत मूलभूत सोयी सुविधा पुरविणे २०२४- २५ ग्रामपंचायत तावशी येथील रानमळा रस्ता ते दौलत आसबे रस्ता खडीकरण करणे या कामासाठी ०५ लाख निधी मंजूर करण्यात आले. या निधीतून जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग सोलापूर यांच्या वतीने होणाऱ्या कामाचे भूमिपूजन खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

या गाव भेट दौऱ्यात काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष संदीप पाटील, नितीन शिंदे संजय यादव, बाळासाहेब यादव, हनुमंत आसबे, सरपंच अमोल कुंभार, उपसरपंच दिपक पाटील, औदुंबर घाडगे, दत्तात्रय घाडगे, सरपंच धनाजी माने, मेजर दत्तात्रय घाडगे, दिलीप वाडेकर, शिवाजी घाडगे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वात्रटिका

### धक्का आणि हादरा

विदेशात नाही तर इथं
इथंच महाराष्ट्रात घडलं...
नको ते साहित्य पोऱ्याच्या
दप्तरात सापडलं...
कंडोम,चाकू,अंमली पदार्थ
आणि अजून काही सापडलं...
बालकांचे हे प्रौढत्व बघून
आई बापाला कोडं पडलं...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बालमनांना घडवण्यासाठी लहान होता आले पाहिजे - डॉ. राहुल पालके



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** इंग्रजीचा तास सुरु होता... आईने दिलेले फळ कोण तरी खाईन म्हणून ... तो ए फॉर ॲपल म्हणतच नव्हतो असे अनेक विनोदी किस्से सांगून बालमनांना साद घालणारे विनोदी व संवादी व्याख्यान मातृमंदीर मंगल कार्यालय बार्शी या ठिकाणी संपन्न झाले. लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा या प्रसिद्ध ओळी बालमनाचे विश्व साकारतात. लहान मुलांचे विश्व हे कोणाला आवडत नाही? या वयात जर बालमनांवर योग्य संस्कार झालेत तरी ही मुले देशाचे भविष्य घडवू शकतात. या कोवळ्या मनांना प्रफुल्लित करून त्यांच्याबरोबर निरागस जगले पाहिजे. मुलांसाठी आनंदाचे क्षण महत्वाचे असतात. त्यातूनच ती घडत असतात.देशाचे भवितव्य घराघरातून घडते. या बालमनांना घडवण्यासाठी लहान होता आले पाहिजे, असे प्रतिपादन डॉ. राहुल पालके यांनी केले. विवेकानंद संस्कार केंद्र कन्याकुमारी अंतर्गत बार्शी शाखेत आयोजित केलेल्या 'जीवन जगूया हसत खेळत' या विषयावर ते बोलत होते. याप्रसंगी विवेकानंद संस्कार केंद्र बार्शीचे प्रमुख श्री विनोद कबाडे, श्री दत्तात्रय लिंगरे, निलेश कोटकर हे उपस्थित होते. डॉ. पालके यांच्या शाब्दिक कोटी ऐकून विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलत होते. गणिताच्या पाठाला एक मुलगा झोपला होता... सरांनी विचारले असता तो म्हणाला, कालचाच झोपाळाच बरा होता... भूगोलाच्या तासाला पृथ्वी गोल आहे... असे एकजण म्हणाला, चपटे सर मात्र ती चपटी आहे असे कपटींना म्हणाले... विद्यार्थ्यांना या मार्गदर्शनातून त्यांनी त्यांच्या आवडत्या विषयात चांगल्या पद्धतीने कसे यश मिळवायचे हे सांगितले. भाषा,गणित,भूगोल इतिहास, सामान्य विज्ञान, परिसर अभ्यास या विषयातील विनोदी किस्से सांगत त्यांनी बालमनांना प्रफुल्लित केले. एक विद्यार्थी म्हणाला, गाडी पळत आहे तर दुसरा म्हणाला तुझे काय जळत आहे.. एक जण म्हणाला, माझे मन रमत नाही... सुमन त्याला म्हणाली, मला तर नवीन चप्पल घेतल्याशिवाय करमत नाही... या ओळींनी विद्यार्थ्यांमध्ये हशा पिकला. हसत खेळत शिक्षण ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर मुलांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात करिअर करण्याची संधी दिली पाहिजे असल्याचे असे मत याप्रसंगी त्यांनी मांडले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले कबाडे यांनी हे संस्कार केंद्र सन २००९ पासून बार्शीत अविरतपणे कार्य करत असून त्याद्वारे मुलांच्या शारीरिक, बौद्धिक व आध्यात्मिक प्रगतीचा विचार अग्रस्थानी आहे, असे प्रतिपादन केले. या संस्कार केंद्रातून अनेकांना लाभ झाला असून ते तालुक्यापासून राष्ट्रीय स्तरावर कराटे, बुद्धिबळ, योगासने अशा विविध स्पर्धात देदीप्यमान यश मिळवित आहेत, असे सांगितले. लहान गटापासून ते महाविद्यालयीन विद्यार्थी या केंद्राला भेट देतात. विद्यार्थ्यांची सकारात्मक विचारसरणी ठेवून हसतमुखाने कसे राहावे यासाठी हा कार्यक्रम उत्कृष्ट ठरला.

# शिक्षक बाळासाहेब जमाले यांच्या मराठी उतारे पुस्तकाचे प्रकाशन



**कसबे तडवळे (कटूसत्य वृत्त):-** 6 एप्रिल 2025 रोजी रामनवमीचे औचित्य साधून जिल्हा परिषद आदर्श केंद्रीय प्राथमिक शाळा कसबे तडवळे येथील शिक्षक बाळासाहेब जमाले यांच्या मराठी उतारे या नवोदय व शिष्यवृत्तीसाठी उपयुक्त असलेल्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. सदरील पुस्तकाचे प्रकाशन रामचंद्र महाराज महंत राम मंदिर कसबे तडवळे, ज्येष्ठ विधीज्ञ पी. आर.बापू करंजकर बार्शी,शारदा परशुराम करंजकर,वडील माणिकराव जमाले, आई रंजना जमाले, प्राचार्य सच्चिदानंद लोमटे यांच्या शुभहस्ते करण्यात आले.प्रकाशन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना बाळासाहेब जमाले यांनी मराठी उतारे या पुस्तकाची आवश्यकता विषद केली. नवोदय निवड परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांना गणित विषय सोपा वाटतो परंतु मराठी विषयाकडे दुर्लक्ष केल्यामुळे उताऱ्यावरील प्रश्न चुकतात व मराठीला कमी गुण मिळतात.त्यामुळेच आपण या पुस्तकाची निर्मिती केल्याचे त्यांनी सांगितले. पुस्तक प्रकाशन प्रसंगी जगन्नाथ धायगुडे यांनी कसबे तडवळे गावातील नवोदय शिष्यवृत्तीचा पॅटर्न याची सविस्तर माहिती दिली. गरीब विद्यार्थ्यांना सी.बी.एस.ई. मधून शिक्षण घेण्यासाठी नवोदयमध्ये निवड होणे कसे गरजेचे आहे ते सांगितले.ज्येष्ठ विधिज्ञ परशुराम करंजकर यांनी पुस्तक काढल्याबद्दल जमाले सरांचे अभिनंदन केले. त्याच बरोबर स्पर्धा परीक्षेचे मोफत मार्गदर्शन करतात याबद्दल सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.रामचंद्र महाराज तडवळकर यांनी अध्यक्षीय समारोपात आज रामनवमीच्या दिवशी या पुस्तकाचे प्रकाशन होत आहे हा कपिलाष्ठमीचा मोठा योग आहे असे सांगितले.जमाले कुटुंबीयांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान तसेच धार्मिक कार्य चांगले असल्याचे सांगितले.मराठी उतारे या पुस्तकाच्या हजारो प्रति विकल्या जातील असा आशीर्वाद ही दिला. याप्रसंगी स्वतःच्या घरी दररोज मुलांना शिकवणाऱ्या शर्मिला जमाले यांचाही सत्कार रामचंद्र महाराज यांच्या हस्ते करण्यात आला.आभार प्रदर्शन करताना शिवाजी महाविद्यालय येथील डॉक्टर डी.के.जमाले यांनी पुस्तकाच्या निर्मितीमध्ये त्यांचे बंधू बाळासाहेब जमाले यांच्या अर्धांगिनी सौ नंदिनी जमाले यांचाही सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले.तसेच त्यांचे हे चौथे पुस्तक प्रकाशित झाले असून ते स्पर्धा परीक्षेसाठी अत्यंत उपयुक्त असल्याचे सांगितले व सर्व उपस्थितांचे जमाले परिवाराच्या वतीने आभार मानले.

पुस्तक प्रकाशन प्रसंगी कन्या शाळेचे मुख्याध्यापक रहिमान सय्यद, जगन्नाथ धायगुडे, डॉ.दत्तात्रय जमाले, मोहम्मद नदाफ,दीपक होगले, बाळासाहेब चंद्रसेन करंजकर, मंगेश पाटील,दिलीप पानढवळे, आनंद करंजकर, हनुमंत माळी, नाना जमाले, प्राध्यापक विशाल जमाले, गणेश करंजकर, गणेश जगदाळे, संतोष जाधव व जमाले कुटुंबीय व मित्रपरिवार उपस्थित होते.

# एकलव्य आश्रमशाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे प्रेक्षकांकडून कौतुक



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** येथील एकलव्य प्राथमिक आश्रमशाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साही वातावरणात साजरे झाले. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांचे प्रेक्षकांनी कौतुक केले. या स्नेहसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी आश्रमशाळेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण माने हे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक विनोद घुगे, ग्राम सुधार समितीचे तालुकाध्यक्ष ॲड. बाबुराव हिरडे, यशकल्याणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. गणेश करे - पाटील, भाजपा ओबीसी मोचार्चे प्रदेश सचिव गणेश कराड, डॉ. गणेश राऊत, पोलिस उपनिरीक्षक बिभीषण जाधव, उद्योजक संतोष कुलकर्णी, डिजिटल मीडिया पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष दिनेश मडके, देवळालीच्या सरपंच अश्विनीताई शिंदे, धनंजय शिंदे, सिद्धार्थ वाघमारे, नरेंद्रसिंह ठाकुर, नागेश चेंडगे, गोरख पवार, कृष्णा भागवत, श्रेयस खडके, सुयश खडके, सुयश शिंदे, अथर्व घाडगे आदि मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्नेहसंमेलनाची सुरुवात करण्यात आली. शाळेच्या वतीने स्वातीताई माने, ॲड. संग्रामदादा माने, मुख्याध्यापक अशोककुमार सांगळे, अधीक्षक बाळासाहेब शिंदे यांनी उपस्थितांचा सन्मान करुन स्वागत केले. यावेळी बोलताना रामकृष्ण माने यांनी, शाळेच्या वाटचालीची माहिती दिली. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. त्यांना दर्जेदार शिक्षण मिळण्यासाठी कार्यरत असल्याचेही स्पष्ट केले.

याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना पोलीस निरीक्षक घुगे यांनी, शिक्षणाशिवाय विकास होवू शकत नाही. त्यामुळेच समाजातील दुर्लक्षीत घटकातील मुलांसाठी आश्रमशाळेच्या माध्यमातून शिक्षण सेवा देण्याचे कार्य खूप महत्वाचे असल्याचे सांगितले. तर ॲड. हिरडे यांनी, माने दांम्पत्याच्या सामाजिक, शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. यावेळी करे - पाटील यांनी एकलव्य आश्रमशाळेतील उपक्रम नेहमीच उल्लेखनीय असतात. विद्यार्थ्यांना ज्ञानदान देतानाच सर्वांगीण विकासासाठी होणारे पर्यटन कौतुकास्पद आहेत असे स्पष्ट केले. तर कराड यांनी आश्रमाशाळेच्या प्रगतीसाठी नेहमीच सहकार्य करु. असे आश्वासन दिले.

यावेळी आयोजित कार्यक्रमात आश्रमशाळेतील मुला, मुलींनी आदिवासी, शेतकरी, देशभक्ती, लावणी, गवळणी अशा विविध गीतांवर बहारदार अशी समूहनृत्ये सादर केली. त्यांच्या नृत्यांनी तसेच विनोदी नाटिकानी उपस्थितांची दाद मिळविली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन किशोरकुमार शिंदे यांनी केले. आभार विठ्ठल जाधव यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भास्कर वाळुंजकर, विद्या पाटील, कुमार पाटील, विलास कलाल, प्रल्हाद राऊत, उमेश गायकवाड, सैदास काळे, वदंना भालशंकर, दिपाली माने यांनी परिश्रम घेतले. यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचा स्थापना दिवस उत्साहात साजरा - चेतनसिंह केदार सावंत



**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात भाजपचा स्थापना दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी पाच विधानसभा मतदारसंघातील १४ मंडलामध्ये २०५६ पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या ऑनलाइन कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे संघटन पर्वचे कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मार्गदर्शन केले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिवसाच्या कार्यक्रमाचे सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना दीड कोटी सदस्य नोंदणी झाल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. सोलापूर ग्रामीण पश्चिम जिल्ह्यात २ लाख ७८ हजार ९१३ सदस्य नोंदणी झाली आहे. माजी आमदार राम सातपुते, माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी भाजपच्या स्थापना दिवसाच्या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी सांगोला तालुक्यातील जुजारपूर येथे भाजप पक्ष कार्यालयात भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी भाजपच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी ऑनलाइन कार्यक्रमात सहभाग घेतला. यावेळी भाजपचे तालुकाध्यक्ष दुर्योधन हिप्परकर, बाळाप्पा येलपले, लक्ष्मण येलपले, अनिल चौगुले, विनायक बाबर, विष्णू हिप्परकर, मोहन बजबळे, सागर बजबळे, विश्वास करडे, विजय पवार, गणेश घाडगे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी कार्यकर्ते शक्तीकेंद्र प्रमुख, बूथ प्रमुख उपस्थित होते.

# सोलापुरातील मिरवणुकीत फक्त एक टॉप, एक बेसच लावा

## पोलिस आयुक्त एम. राजकुमार; डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती शांतता कमिटीची बैठक



**सोलापूर : (कटुसत्य वृत्त):-** महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती सांगता मिरवणूक रविवारी (दि. २०) निघणार आहे. या मिरवणुकीत एक बेस आणि एकच टॉप स्पीकर लावत सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या आवाजाची मर्यादा पाळावी. शांततेच्या मार्गाने डॉ. आंबेडकर जयंती साजरी होण्यासाठी पोलीस आपल्या पाठीशी असल्याचे मत पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी शांतता कमिटी बैठकीत केले.

पोलीस आयुक्तालयात सोमवारी दि. ७ झालेल्या बैठकीत दोन्ही मध्यवर्ती मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी यांच्यात संयुक्त बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे, पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलीस आयुक्त राजन माने, सहायक पोलिस आयुक्त प्रताप पोमण, यशवंत गवारी, सुधीर खिडकर, महापालिकेचे सारिका कुलवार, आरटीओचे अधिकारी, महावितरण, अग्निशामक, धमार्दाय आयुक्तचे अधिकारी यांच्यासह राजाभाऊ सरवदे, राजाभाऊ इंगळे, के डी. कांबळे, अजित गायकवाड, बाळासाहेब वाघमारे, आनंद चंदनशिवे यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

पोलीस आयुक्त एम राजकुमार म्हणाले, महामानव डॉ. आंबेडकर जयंती ही साजरी करण्यात टॉप तीनमध्ये सोलापूर हे प्रथम क्रमांकावर आहे. नागपूर तिसऱ्या तर मुंबई दुसऱ्या क्रमांकावर असल्याचे त्यांनी सांगितले. सहायक पोलीस आयुक्त विभाग एक प्रताप पोमण यांनी केले. प्रास्ताविक पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी केले. मिरवणुकीत सहभागी होण्यासाठी देशमुख पाटील वस्ती, देगाव नाका येथून येणाऱ्या मिरवणुका येतात. या मंडळांसाठी मिरवणुकीत गाड्या सजवण्यासाठी त्यांना फौजदार चावडी ते भैय्या चौक दरम्यान जाणारा रस्ता दिला जाईल.

# संग्रामनगर येथे राम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** संग्रामनगर येथील श्री साईबाबा सेवा ट्रस्ट यांच्या वतीने श्रीराम जन्मोत्सव व श्री साई प्राणप्रतिष्ठाचा २८ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने श्री साईबाबा मंदिरात पहाटे श्री साईबाबांच्या मूतीर्चा अभिषेक व महापूजा करण्यात येऊन सकाळी ८ वाजता विश्वशांती यज्ञ विकास भोसले व सौ प्रियांका भोसले यांच्या हस्ते अग्नी प्रज्वलीत करण्यात आला.या नंतर शिवशंभो भजनी मंडळ यांचे भजन सेवा होऊन दुपारी १२ वाजता श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सौ.युगंधरादेवी क्रांतीसिंह माने- पाटील यांच्या हस्ते दुपारची महाआरती करण्यात आली. यावेळी संग्रामनगरचे सरपंच पंकज गाडे, उपसरपंच सौ.तेजश्री माने देशमुख, राजमाने, पाटील, जसभाई पटेल आदी मान्यवर उपस्थितीत होते.आरती नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सुमारे अडीच ते तीन हजार भाविकांनी याचा लाभ घेतला. सायंकाळची आरती हनुमंत खडके यांच्या हस्ते करण्यात आली.यावेळी सहकार महर्षी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांनी श्रीराम व श्री साईबाबा चे दर्शन घेतले. सायंकाळी ब्रह्मचैतन महिला मंडळ माळीनगर व ओंकार महिला भजनी मंडळ शंकरनगर यांनी आपली भजन सेवा सादर केली.या सर्वांचा सत्कार ट्रस्टचे अध्यक्ष किशोरसिंह माने पाटील व सचिव ॲड.राजेंद्र आर्वे यांच्या हस्ते करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्वामी विवेकानंद तरुण मंडळ,शिवगर्जना ग्रुप लोणार गल्ली,क्रांतिसिंह रिक्षा टॉप व अकलूज बुरुड समाज तसेच ट्रस्टचे सदस्य देवचंद ओसवाल,अरुण राऊत, अशोक गुजर, चंद्रकांत कुंभार, विजय टोंगळे, सुभाष काळे,दीपक शिंदे उमेश शेटे, सर्व सदस्य यांनी विशेष सहकार्य केले.डॉ रावसाहेब गुळवे, उदय टेके, मनोज रेळेकर, सागर नेवसे, प्रदीप भोसले, रोहन वेळापुरे, निखिल फुले, श्री व सौ जुनेजा महेश खडके व लोकमान्य व शिवरत्न गणेशोत्सव मंडळाचे सर्व सदस्य उपस्थितीत होते.

# सोलापुरात स्कूल बसचे चाक डोक्यावरून गेल्याने १३ वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात स्कूल बसमधून पडल्याने विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना आज (दि. ८) घडली. या घटनेनंतर हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी बसचालक, वाहक आणि शाळा प्रशासनावर गुन्हा दाखल करण्याची मागणी शिवसेना शिंदे गटाने केली आहे.

अनुराग तीपण्णा राठोड (वय १३) असे मृत मुलाचे नाव आहे. तो शाळेतून घरी जाताना बसमधून खाली पडला. त्यानंतर त्याच्या डोक्यावरून बसचे चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अनुरागच्या मृत्यूची बातमी कळताच कुटुंबियांनी एकच आक्रोश केला.

बसमध्ये विद्यार्थी असताना दरवाजा बंद करणे गरजेचे असताना देखील गाडीतील वाहकाने काळजी घेतली नसल्याने विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचा आरोप शिवसेना शिंदे गटाने केला आहे. याप्रकरणी बसचालक, वाहक आणि शाळा प्रशासनावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# बार्शी नगरपरिषद, बार्शी

## स्थापत्य विभाग

जा.क्र./स्थापत्य/१८०० दिनांक : ०८/०४/२०२५

## ई- निविदा सुचना क्र.२८ सन २०२४/२५

Main portal : http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन बार्शी नगरपरिषदेकडील खालील कामांकरिता ई - नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

### ई- निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांकः- ०८/०४/२५ वेळ दुपारी १६:०० पासुन<br>दिनांकः- १६/०४/२५ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| २) | निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी | दिनांकः- ०८/०४/२५ वेळ दुपारी १६:०० पासुन<br>दिनांकः- १६/०४/२५ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ३) | बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप आणि ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप व्यक्तिशः स्वतःचे नावाची गोपनियता बाळगुन सिलबंद लखोटयात तांत्रिक लिफाफ्या सह सादर करणेचा दिनांक | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयामध्ये दिनांक १६/०४/२५ रोजी दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ४) | तांत्रिक व अर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक वेळ | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयात दिनांक १७/०४/२५ रोजी दुपारी १७:३० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

टिप :-

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधरकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई-निविदा प्रणालिच्या Main portal : http://mahatenders.gov.in व याच http:// mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे अवश्यक आहे.

२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काहीशंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर ( १८००-२३३-७३१५)

३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रक्कमेची ऑनलाईन पे स्लीप व ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलाड करणेसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे अवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.

४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहवयास मिळतील सदर कामाची एक अथवा सर्व ई- निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

५. ई - निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र. १ मधिल अपलोड केलेल्या कागदपत्राची हार्ड कॉपीची प्रमाणित प्रत दि. १६/४/२५ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करणेची आहे.

बार्शी नगरपरिषद बार्शी

सही/-
मुख्याधिकारी
बार्शी नगरपरिषद, बार्शी